# परिशिष्ट्ये

# कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहाचे आतिल क्षेत्रफळ दर्शवणारा तक्ता
## (प्रत्यक्ष मोजणी करून दि.०९/०३/२००७)

१. तट चे आतील क्षेत्रफळ - १२,२३,३१५.५० चौरस फूट

२. तट चे आतील क्षेत्रफळ - १२,१०.५५ हेक्टर आर

३. तट चे आतील क्षेत्रफळ - ३१ एकर




१. ११०७ + ११८६ = २२९३ ÷ २ = ११४६.५० } चारही बाजू समान करणे करीता २ ने भागणे.

२. ९९३ + ११४१ = २१३४÷ २ = १०६७

३. ११४६.५० X १०६७ = १२,२३,३१५.५० चौरस फूट

दिनांक २८।१२।१० पुढारी पुरवणी पान. ५

# कारागृहातील बंदी ठरला 'लेखणी सम्राट'

**कोल्हापूर :** कोल्हापुरातील कळंबा कारागृहात शिक्षा भोगत असतानाही बंदी गजानन खडके यांनी आपल्या लेखनशैलीतून स्वत:चे वेगळेपण दाखवून दिले आहे. हुपरी येथील श्री साई बहुद्देशीय सामाजिक सेवाभावी संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या हुपरी 'लेखणी सम्राट - २०१०' या राज्यस्तरीय खुल्या गटातील निबंध स्पर्धेत श्री. खडके यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

हातून घडलेल्या गुन्ह्यांमुळे कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत असतानाही गजानन बाळासाहेब खडके यांनी आपली लेखन कला सुरू ठेवली आहे. हुपरी 'लेखणी सम्राट' या स्पर्धेसाठी त्यांनी 'फॅशनचे वाढते स्वरूप' व 'भारतीय संस्कृती' या विषयावर निबंध सादर केला होता. संस्थेतर्फे त्यांना रोख १ हजार १०० रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कळंबा कारागृहाचे अधीक्षक जे. एस. नाईक यांनी खडके यांचे पुणे येथील अप्पर पोलीस महासंचालक, (कारागृह) संजयकुमार वर्मा यांच्यातर्फे अभिनंदन केले व लेखन कलेस चालना दिला. कारागृहाचे वरिष्ठ तुरुंगाधिकारी एम. एन. कांबळे डी. जी. गावडे तसेच शिक्षक एस. आर. जाधव व एच. बी. बिराजदार यांनी गजानन खडके यांना मार्गदर्शन केले.

BARR. B. K. SAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

दिनांक ५/११/२०.. पुढारी पुरवणी पान नं. ३

# 'जीवन'ने शिकविला जीवनाचा अर्थ!

## कळंबा कारागृहात बनतोय केशव पंडित

### कळंबा करागृहातील कैद्याची शिक्षणाची अनोखी जिद्द

### कारागृहातूनच घेतलं पदव्युत्तर शिक्षण

### इतर कैद्यांना 'जीवन' देतोय ज्ञानाचा संदेश

■ जान्हवी सराटे

कोल्हापूर : जाणते-अजाणतेपणी केलेले गुन्हे... त्या बदल्यात झालेली शिक्षा... शिक्षा म्हणजे अंधार कोठडीतील जीणे... पुढील जीवनही अनेकदा अंधकारमयच... कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या कैद्याचे सर्रास हे असेच आयुष्य; पण असे आयुष्य न जगता पुन्हा एकदा समाजात माणूस म्हणून जगण्यासाठी उमेद बाळगली ती 'जीवन'ने. जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या जीवनने तुरुंगातील अंधकारमय कोठडीत ज्ञानाची ज्योत पेटविण्याचा प्रयत्न केला आहे. मागच्या पार्श्वभूमीला कवटाळून न बसता गुन्ह्याचा डाग पुसण्याचा प्रयत्न मिरज येथील जीवन वाघारे करत आहे. कळंबा कारागृहातून त्याने पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून सध्या तो विविध स्पर्धा परीक्षांचे धडे गिरवत आहे. इतर कैद्यांनाही एक जगण्याची इच्छाशक्ती बनून आशेचा किरण दाखवत आहे.

जीवन हा मुळचा मिरज इथला राहणारा. पेशाने तो तसा सामाजिक कार्यकर्ता होता. अनेकांना मदतीचा हात देणार जीवन याला २००६ मध्ये खुनाच्या गुन्ह्याखाली जन्मठेपेची शिक्षा सुनावली गेली. या कारागृहातील वेळ वाया न घालवता प्रशासनाच्या सहकार्याने त्याने ज्ञानाचा साठा घेण्याचा निर्णय घेतला. नैराश्यमय अंधकार दूर सारून गेल्या चार वर्षांपासून कळंबा कारागृहात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर मानवाधिकाराच्या पदव्युत्तर शिक्षणात प्रथम वर्षात उत्तीर्ण आणि सध्या द्वितीय वर्षातील शिक्षण सुरू आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील इतिहास विषयातून मे २००७ मधील बी.ए. पदवी परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळविले. तसेच गुजरात विद्यापीठ अहमदाबादकडून आयोजित गांधी विचार परिचय परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे. नेट सेट, महाराष्ट्र राज्य आयोगाची परीक्षा अशा अनेक स्पर्धापरीक्षा देण्याची सध्या तयारी तो करत आहे. या शिक्षणासाठी जीवने कारागृहात दैनंदिन काम करून रोज पाच ते सहा तास अभ्यासासाठी देत आहे आणि या साऱ्याला कळंबा कारागृहातील अधीक्षक जयंत नाईक यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचेही जीवन सांगतो. कैद्याचे पुनर्वसनासाठी अशा विविध उपक्रम राबवून माणूस म्हणून जगताना फार महत्त्वाच्या या गोष्टी आहेत. कारागृहातून सुटल्यावर आपण या शिक्षणाचा उपयोग तरुण पिढीला मार्गदर्शनसाठी करणार आहे. 'जीवन' समाजाला चर्चा करून व सामोपचाराने वाद मिटवा असेही आवाहन करत आहे.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी स्वातंत्र्याची उर्मी दिली आज वेळ बदली, काळ बदलला आणि या कारागृहात समाजात गुन्हे करणाऱ्यांना येथे शिक्षेच्या स्वरूपात आणले जाऊ लागले, परंतु, केलेल्या वाईट कृत्याची पार्श्वभूमी कवटाळून न बसता समाजातील आदर्श व्यक्ती कसे बनता येईल याचा आदर्श नमुना 'जीवन' या अंधारमय कोठडीतून प्रेरणादायी इतिहासात परिवर्तीत केली आहे.

लोकसत्ता १८।३।०८

# जन्मठेपेची शिक्षाच ठरली आयुष्याला नवी दिशा देणारी

मिरज, १७ मार्च / दिगंबर शिंदे

क्रोधाग्नीत झालेला खून... त्याची सजा म्हणून आयुष्याला लाभलेली जन्मठेप... अन् याच कोठडीत सृजनशील मनात उमटलेल्या रंगरेषेच्या भावभावनांना कागदावर चितारण्याचे कसब... हीच पेन्सिल शेडिंगची कला अन्य पाच विद्यार्थ्यांना दोन महिन्यात शिकवली, तर मोकळ्या आकाशात विहार करण्याची सुप्त इच्छा फलद्रूप करण्यात यशस्वी ठरावी अशी मनोमन महत्त्वाकांक्षा घेऊन एक बंदी झगडत आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाने मिळालेले ९० दिवस त्याच्या दृष्टीने पाच कलाकार घडविण्यासाठी पुरेसे ठरतात का?... पुन्हा एकदा अंधार कोठडीच मिळणार हे सध्या तरी अनभिज्ञच.



मिरजेत राहणारा सुरेश जाधव सध्या कोल्हापूरच्या कळंबा कारागृहात जन्मठेप भोगतोय. भावनेच्या भरात कराटेचा खेळाडू असणाऱ्या सुरेशकडून एकाचा खून झाला. न्यायालयीन प्रक्रिया पार पडली. कायद्याने त्याला जन्मठेपच सुनावली. वय तर अवघे २०- २२,



पण हीच अंधार कोठडी त्याच्या आयुष्याला नवी दिशा देणारी ठरते की काय, असा प्रश्न यानिमित्ताने उभा राहिला. तुरुंगातील शिक्षेदरम्यान केल्या जाणाऱ्या कामाबद्दल रोजचा पगार अवघा १२ रुपये ५० पैसे या रोजगारातून छंद जोपासण्यासाठी कागद, रंगीत खडू अन् पेन्सिल भेटली.



**जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या सुरेश जाधव याने तुरुंगाच्या अंधार कोठडीतही पाहिला प्रकाशाचा किरण. त्याने कागदावर पेन्सिलीने रेखाटलेली ही चित्रे त्याच्यातील कलावंताला जिवंत ठेवू शकली.**

अंधार कोठडीतील मन खायला उठणारा वेळ सुरेशने पेन्सिल शेडिंगची चित्रे साकारण्यात घालविण्यास सुरुवात केली. सहा वर्षांच्या तुरुंगवासातील चार वर्षे तो पेन्सिल शेडिंगचा सराव करीत आहे. अन् या



सरावाला ना कोणाचं मार्गदर्शन ना कोणाचा सल्ला. स्वतःच विद्यार्थी, स्वतःच शिक्षक अन् परीक्षक म्हणून लाभणारे समाजातील गुन्हेगार. यातूनच ही कला विकसित होत गेली. आज त्याने पेन्सिल शेडिंगने चितारलेली असंख्य चित्रे मन वेधून घेतात.

राजर्षि शाहू महाराज, छत्रपती शिवराय ही दैवते तर त्याने रेखाटलीच. पण त्याच्या सृजनशक्तीला चित्रपटातील ऐश्वर्या व मधुबाला या तारकांना, निसर्गातील विविध छटांना स्थान मिळाले, तर कळंबा कोटातील जादू घोड्याचा वेग कागदावर चितारण्यात यशस्वी ठरते. गजाआडच्या साहित्य संमेलनात सुरेशच्या चित्रांचे प्रदर्शन मांडण्यात आले अन् कौतुकाचे शब्दही या जन्मठेपेच्या कैद्यातील माणूस जिवंत असल्याचे सांगून गेले.

सुरेशला जन्मठेपेची शिक्षा ऐकल्याबरोबर आयुष्याच्या साऱ्या आशा- आकांक्षांना पूर्णविराम मिळाला असे वाटले होते. संवेदनशील मनाला केल्या प्रकाराचा पश्चात्तापही झाला. पण सुधारण्याची संधी अंधारातील मनाच्या एकाग्रतेने दिली. शिक्षा झालेला सुरेश आता यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमासाठी पात्र ठरला असून पदवीनंतर व्यावसायिक अभ्यासक्रम शिकण्याची त्याला इच्छा आहे.

दरम्यान, शिक्षा भोगत असतानाच जन्मठेपेच्या शिक्षेबद्दल उच्च न्यायालयात अपील सुरू आहे. यावेळी जामीन मिळावा यासाठी सुरेशने मुंबई उच्च न्यायालयात अर्ज केला आहे. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर. एम. खांडेपारकर व ए. ए. सय्यद यांच्या खंडपीठाने तीन महिन्यांची सशर्त सुट्टी सुरेशला मंजूर केली आहे. या तीन महिन्यात पाच रांगोळीकार घडवायचे आहेत. त्यासाठी तो महाविद्यालयात भावी चित्रकार शोधण्यात मग्न आहे. डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात त्याला आशेचा किरणही दिसला आहे.



कारागृहातील बंद्यांनी साडीवर हाताने केलेली कलाकुसर



कारागृहातील बंद्यांनी साडीवर हाताने केलेली कलाकुसर



कारागृहातील बंद्यांनी साडीवर हाताने केलेली कलाकुसर



कारागृहातील बंद्यांनी साडीच्या काठावर हाताने केलेली कलाकुसर



कारागृहातील बंद्यांनी साडीच्या काठावर हाताने केलेली कलाकुसर



कारागृहातील बंद्यांनी साडीच्या काठावर हाताने केलेली कलाकुसर



**कारागृहातील बंद्यांनी तयार केलेल्या बेडशिटस्**

**तक्का**







कारागृहातील
बंद्यांनी तयार
केलेले फर्निचर
(खुर्च्या)



कारागृहातील बंद्यांनी तयार केलेल्या उश्या



कारागृहातील बंद्यांनी तयार केलेली गादी



कारागृहातील बंद्यांनी तयार केलेले बेकरी पदार्थ (केक)



कारागृहातील बंद्यांनी तयार केलेले बेकरी पदार्थ (क्रिमरोल)



कारागृहातील बंद्यांनी तयार केलेल्या सजावटीच्या वस्तू (बैलगाडी)



कारागृहातील बंद्यांनी तयार केलेल्या सजावटीच्या वस्तू (बैलगाडी)



कारागृहातील बंद्यांनी तयार केलेले ड्रेस



कारागृहातील बंद्यांनी तयार केलेले ड्रेस

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR



कारागृहातील बंद्यांनी
तयार केलेल्या
सजावटीच्या वस्तु
(बांगडी स्टॅण्ड)

देवघर



ARR. BALAS... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.